| | |
|---|---|
| **MHPU26-000075-2010** | **दाखल दिनांक** – ३०/०१/२०१०<br>**नोंदणी दिनांक** – ३०/०१/२०१०<br>**निकाल दिनांक** – २४/०६/२०२६<br>**कालावधी** – १६ व. ०४ म. २५ दि. |

**(भाग - अ)**

**४ थे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात वडगांव मावळ, पुणे**

**(पिठासन अधिकारी :- व्ही. आर. डोईफोडे)**

**नि.फौ.ख.क्र.५६/२०१०**

**नि.क्र.१०६.**

**अभियोगपक्ष - महाराष्ट्र शासन,**
**पोलीस स्टेशन अधिकारी,**
**तळेगाव दाभाडे पोलीस स्टेशन, पुणे.**
**(गु.र.क्र.२२४/२००९)**

**अभियोगपक्षातर्फे - सहाय्यक सरकारी अभियोक्ता -**
**श्री. एस. एस. पवार**

**-विरुध्द-**

**आरोपी क्र. - १) रामचंद्र खंडु भेगडे ,**

वयः६१ वर्षे, व्यवसायः सेवानिवृत्त.
रा. खळवाडी, तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि.पुणे.

**२) प्रविण रामचंद्र भेगडे ,**

वयः २७ वर्षे, व्यवसायः शेती.
रा. खळवाडी, तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि.पुणे.

**३) प्रशांत रामचंद्र भेगडे ,**

वयः २७ वर्षे, व्यवसायः शेती.
रा. खळवाडी, तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि.पुणे.

**४) अनुप तानाजी भेगडे ,**

वयः २२ वर्षे, व्यवसायः ड्रायव्हर.
रा. खळवाडी, तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि.पुणे.

**५) तानाजी मुकुंद भेगडे ,**

वयः ४७ वर्षे, व्यवसायः ड्रायव्हर.
रा. खळवाडी, तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि.पुणे.

**६) विलास सिताराम भेगडे ,**

वयः ४५ वर्षे, व्यवसायः शेती.
रा. खळवाडी, तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि.पुणे.

**७) उषा विलास भेगडे ,**

वयः ३४ वर्षे, व्यवसायः शेती.
रा. खळवाडी, तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि.पुणे.

**८) सौ. नंदा तानाजी भेगडे ,**

वयः ४३ वर्षे, व्यवसायः घरकाम.
रा. खळवाडी, तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि.पुणे.

**९) सौ. लक्ष्मी रामचंद्र भेगडे ,**

वयः ५५ वर्षे, व्यवसायः घरकाम.
रा. खळवाडी, तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि.पुणे.

**१०) श्रीमती सावित्री रामचंद्र भेगडे (मयत),**

वयः ८० वर्षे, व्यवसायः घरकाम.
रा. खळवाडी, तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि.पुणे.

**आरोपी तर्फे विधिज्ञ - श्रीमती आर. आर. भासले**

**(भाग – ब)**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | दि.११/१२/२००९ |
| फिर्याद दिल्याची तारीख | १२/१२/२००९ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | ०६/०९/२०१२ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | ०६/०९/२०१२ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण ठेवल्याची तारीख | २४/०६/२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | २४/०६/२०२६ |
| आरोपीला शिक्षा ठोठावली असेल तर, त्याची तारीख | निरंक |

**(आरोपींचे तपशील)**

| आरोपीचा अ.क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | आरोपीवर ठेवलेले दोषारोप | आरोपीला निर्दोष किंवा दोषी ठरविल्याची तारीख | शिक्षा लादलेला असल्यास | शिक्षा वजावट केल्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **१.** | **रामचंद्र खंडु भेगडे ,** | १३/१२/२००९ | १४/१२/२००९ | भा.दं.वि. कलम १४३,१४७, १४८,४५२ ३२४,३२३, ५०४,५०६, ४२७ अन्वये | निर्दोष ठरविल्याची तारीख २४/०६/२०२६ | निरंक | निरंक |
| **२.** | **प्रविण रामचंद्र** | १३/१२/२००९ | १४/१२/२००९ | भा.दं.वि. कलम | २४/०६/२०२६ | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **भेगडे ,** | | | १४३,१४७, १४८,४५२ ३२४,३२३, ५०४,५०६, ४२७ अन्वये | | | |
| **३.** | **प्रशांत रामचंद्र भेगडे ,** | १३/१२/ २००९ | १४/१२/ २००९ | भा.दं.वि. कलम १४३,१४७, १४८,४५२ ३२४,३२३, ५०४,५०६, ४२७ अन्वये | २४/०६/२० २६ | | |
| **४.** | **अनुप तानाजी भेगडे ,** | १३/१२/ २००९ | १४/१२/ २००९ | भा.दं.वि. कलम १४३,१४७, १४८,४५२ ३२४,३२३, ५०४,५०६, ४२७ अन्वये | २४/०६/२० २६ | | |
| **५** | **तानाजी मुकुंद भेगडे ,** | १३/१२/ २००९ | १४/१२/ २००९ | भा.दं.वि. कलम १४३,१४७, १४८,४५२ ३२४,३२३, | २४/०६/२० २६ | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ५०४,५०६, ४२७ अन्वये | | | |
| **६.** | **विलास सिताराम भेगडे ,** | १३/१२/ २००९ | १४/१२/ २००९ | भा.दं.वि. कलम १४३,१४७, १४८,४५२ ३२४,३२३, ५०४,५०६, ४२७ अन्वये | २४/०६/२० २६ | | |
| **७.** | **उषा विलास भेगडे ,** | १५/१२/ २००९ | १५/१२/ २००९ | भा.दं.वि. कलम १४३,१४७, १४८,४५२ ३२४,३२३, ५०४,५०६, ४२७ अन्वये | २४/०६/२० २६ | | |
| **८.** | **सौ. नंदा तानाजी भेगडे ,** | १५/१२/ २००९ | १५/१२/ २००९ | भा.दं.वि. कलम १४३,१४७, १४८,४५२ ३२४,३२३, ५०४,५०६, ४२७ अन्वये | २४/०६/२० २६ | | |
| **९.** | **सौ. लक्ष्मी** | १५/१२/ | १५/१२/ | भा.दं.वि. | २४/०६/२० | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **रामचंद्र भेगडे ,** | २००९ | २००९ | कलम १४३,१४७, १४८,४५२ ३२४,३२३, ५०४,५०६, ४२७ अन्वये | २६ | | |
| **१०.** | **श्रीमती सावित्री रामचंद्र भेगडे (मयत) ,** | १५/१२/२००९ | १५/१२/२००९ | भा.दं.वि. कलम १४३,१४७, १४८,४५२ ३२४,३२३, ५०४,५०६, ४२७ अन्वये | २४/०६/२०२६ | | |

**(भाग – क)**

**(अभियोगपक्षातर्फे साक्षीदारांची यादी)**

| **साक्षीदाराचे अ.क्र.** | **पुराव्याचा तपशील** | **नाव** |
|---|---|---|
| निरंक | **निरंक** | निरंक |

आरोपीतर्फे तोंडी पुरावा देण्यात आलेला नाही.

**(अभियोगपक्षातर्फे/आरोपीतर्फे पुरावा निशाणी क्रमांक यादी)**

| **अ.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **तपशील** |
|---|---|---|
| **१.** | **निरंक** | **निरंक** |

आरोपीतर्फे लेखी अथवा तोंडी पुरावा देण्यात आलेला नाही.

**(मुद्देमाल)**

| **अ.क्र.** | **मुद्देमालाचे वर्णन** | **मुद्देमाल जप्त क्रमांक** |
|---|---|---|
| **१.** | दोन काठी, एक तलवार | २००९ |

## <u>न्यायनिर्णय</u>

**(घोषित दिनांक २४/०६/२०२६)**

आरोपी क्र. १ ते ९ हे भारतीय दंड विधान संहिता कलम १४३,१४७,१४८,४५२,३२४,३२३,५०४,५०६,४२७ प्रमाणे संपरिक्षेस सामोरे जात आहेत.

**<u>अभियोगपक्षातर्फे घटनेबाबत थोडक्यात हकीकत अशी की</u>,**

०२. दि. ११/१२/२००९ रोजी सायंकाळी ७.०० वा चे सुमारास मौजे खळवाडी, तळेगाव दाभाडे गावचे हद्दीत फिर्यादीचे राहते घरी आरोपींनी बेकायदा जमाव जमवुन पुर्वी आमचे विरुध्द दिलेल्या तक्रारीचे कारणावरुन अनाधिकाराने फिर्यादीचे घरात घुसून लाथाबुक्क्यांनी फिर्यादी व फिर्यादीचे आई वडील व पत्नी यांना मारहाण करुन आरोपी क्र. १ हा फिर्यादीचे डावे दंडावर चावुन आरोपी क्र. ३ यांनी हातातील उलटी तलवारीने फिर्यादीचे कपाळावर मारहाण करुन आरोपी क्र. २ व ४ यांनी फिर्यादीचे वडीलांना काठीने मारहाण केली व घरातील कपाटाचे काचा फोडुन नुकसान केले तसेच भांडणात फिर्यादीचे आईचे मंगळसुत्र व मोबाईल फोन पडून गहाळ झाला आहे. त्यामूळे दि. १२/१२/२००९ रोजी **गुन्हा रजिस्टर क्रमांक. २२४/२००९** नुसार तळेगाव दाभाडे पोलिस स्टेशन येथे गुन्हा नोंदवण्यात आला.

**<u>गुन्हयाचा तपास :</u>**

०३. सदर गुन्हा झाले नंतर तपासी अंमलदार एस. आर. आठवले पोलीस हवा. यांनी तपास केला. तपासादरम्यान तपासी अधिकारी यांनी घटनास्थळाचा जप्ती पंचनामा तयार केला, साक्षीदाराचे जाबजबाब नोंदवले. गुन्हयातील हत्यार जप्त केले. तपासाअंती न्यायालयात आरोपी यांच्याविरुध्द दोषारोप दाखल केले.

**गुन्ह्याचा तपशील व प्रतिकथन :**

०४. आरोपी क्र. १ ते ९ यांच्याविरुध्द भारतीय दंड विधान कलम १४३,१४७,१४८,४५२,३२४,३२३,५०४,५०६,४२७ अन्वये नि.५१ वर दोषारोपपत्र नोंदवण्यात आले. आरोपीने गुन्हा अमान्य केला व संपरिक्षेची मागणी केली.

**आरोपीचा जबाब व त्यांचा बचाव :**

०५. आरोपीचे विरूद्ध अभिलेखावर पुरावा न आल्याने आरोपीविरूद्ध फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ (१) (ब) अंतर्गत जबाब नोंदवण्यात आले नाही.

**पुरावा :**

०६. अभियोगपक्षास पुरेशी संधी देवूनही अभियोगपक्ष एकाही साक्षीदाराची साक्ष नोंदवू शकला नाही त्यामुळे प्रकरणाचे जुने स्वरुप पाहता अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

**युक्तीवाद :**

०७. सुज्ञ सरकारी विधीज्ञ श्री एस. एस. पवार यांनी असा युक्तीवाद केला की, अभियोगपक्षाचे एकही साक्षीदार न नोंदवल्यामुळे योग्य तो निर्णय पारित करण्यात यावा. आरोपीचे सुज्ञ विधीज्ञ श्रीमती. भोसले यांनी असा युक्तीवाद केला की, अभियोग पक्षाने एकही साक्षीदार न तपासल्यामुळे आरोपीस निर्दोषमुक्त करणेत यावे.

**मुद्दे :-**

०८. आरोपीवर ठेवण्यात आलेला दोषारोपपत्र, अभियोग पक्षातर्फे देण्यात आलेला मौखिक पुरावा व दोन्ही पक्षांचा युक्तीवाद पाहता खालील मुद्दे माझ्या निदर्शनास आले व त्यांचे निष्कर्ष व कारणे व अंतिम निर्णय मी खालील प्रमाणे देत आहे.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष हे सिद्ध करतो काय की, दि. ११/१२/२००९ रोजी १९.०० वाजण्याच्या सुमारासम मौजे खराळवाडीत फिर्यादीचे राहते घरात आरोपींनी | |

| | | |
|---|---|---|
| | समान उद्देशाच्या पुर्ततेसाठी एकत्र जमुन बेकायदा जमाव केला व त्यायोगे **भा.द.वि. कलम १४३** अन्वये अपराध केला आहे काय ? | **नाही...** |
| २. | अभियोग पक्ष हे सिद्ध करतो काय की, वर नमुद तारखेला, वेळेला, ठिकाणी तुम्ही आरोपींनी समान उद्देशाच्या पुर्ततेसाठी बेकायदेशीर जमाव जमवून बलप्रयोग व हिंसाचार केला व त्यायोगे **भा.द.वि. कलम १४७** अन्वये अपराध केला आहे काय ? | **नाही...** |
| ३. | अभियोग पक्ष हे सिद्ध करतो काय की, वर नमुद तारखेला, वेळेला, ठिकाणी तुम्ही आरोपींनीसमान उद्देशाच्या पुर्ततेसाठी बलप्रयोग व हिंसाचार करुन दंगा केला व त्यायोगे **भा.द.वि. कलम १४८** अन्वये अपराध केला आहे काय ? | **नाही...** |
| ४. | अभियोग पक्ष हे सिद्ध करतो काय की, वर नमुद तारखेला, वेळेला, ठिकाणी आरोपींनी समान उद्देशाच्या पुर्ततेसाठी हमला करण्याची पूर्व तयारी करुन गृह अतिक्रमण केले व त्यायोगे **भा.द.वि. कलम ४५२** अन्वये अपराध केला आहे काय ? | **नाही...** |
| ५. | अभियोग पक्ष हे सिद्ध करतो काय की, वर नमुद तारखेला, वेळेला, ठिकाणी आरोपींनी समान उद्देशाच्या पुर्ततेसाठी फिर्यादी व त्यांचे वडिलांना तलवार व काठी या प्राणघातक शस्त्राने इच्छापूर्वक दुखापत पोहोचवली व | **नाही...** |

| | | |
|---|---|---|
| | त्यायोगे **भा.द.वि. कलम ३२४** अन्वये अपराध केला आहे काय ? | |
| ६. | अभियोग पक्ष हे सिद्ध करतो काय की, वर नमुद तारखेला, वेळेला, ठिकाणी आरोपींनी समान उद्धेशाच्या पुर्ततेसाठी फिर्यादी व त्यांचे वडिलांना इच्छापूर्वक दुखापत पोहोचवली व त्यायोगे **भा.द.वि. कलम ३२३** अन्वये अपराध केला आहे काय ? | **नाही...** |
| ७. | अभियोग पक्ष हे सिद्ध करतो काय की, वर नमुद तारखेला, वेळेला, ठिकाणी आरोपींनी त्यांच्या समान उद्धेशाच्या पुर्ततेकरीता फिर्यादी व त्यांचे आई वडिलांना शांतताभंग घडवुन आणण्याच्या उद्धेशाने शिवीगाळ करुन अपमान केला व त्यायोगे **भा.द.वि. कलम ५०४** अन्वये अपराध केला आहे काय ? | **नाही...** |
| ८. | अभियोग पक्ष हे सिद्ध करतो काय की, वर नमुद तारखेला, वेळेला, ठिकाणी आरोपींनी त्यांच्या समान उद्धेशाच्या पुर्ततेकरीता फिर्यादी व त्यांचे आई वडिलांना दमदाटी करुन त्यांना जिवे ठार मारण्याची धमकी दिली व त्यायोगे **भारतीय दंड विधान कलम ५०६** प्रमाणे गुन्हा केला आहे काय ? | **नाही...** |
| ९. | अभियोग पक्ष हे सिद्ध करतो काय की, वर नमुद तारखेला, वेळेला, ठिकाणी आरोपींनी त्यांच्या समान उद्धेशाच्या पुर्ततेकरीता फिर्यादीचे घरातील वस्तुंचे नुकसान करुन आगळीक केली व त्यायोगे **भारतीय दंड विधान कलम** | **नाही...** |

| | | |
|---|---|---|
| | **४२७** प्रमाणे गुन्हा केला आहे काय ? | |
| **१०.** | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## <u>कारणमिमांसा</u>

०९. अभियोगपक्षाच्या कथनांनुसार दि. ११/१२/२००९ रोजी सायंकाळी ७.०० वा चे सुमारास मौजे खळवाडी, तळेगाव दाभाडे गावचे हद्दीत फिर्यादीचे राहते घरी आरोपींनी बेकायदा जमाव जमवुन पुर्वी आमचे विरुध्द दिलेल्या तक्रारीचे कारणावरुन अनाधिकाराने फिर्यादीचे घरात घुसून लाथाबुक्क्यांनी फिर्यादी व फिर्यादीचे आई वडील व पत्नी यांना मारहाण करुन आरोपी क्र. १ हा फिर्यादीचे डावे दंडावर चावुन आरोपी क्र. ३ यांनी हातातील उलटी तलवारीने फिर्यादीचे कपाळावर मारहाण करुन आरोपी क्र. २ व ४ यांनी फिर्यादीचे वडीलांना काठीने मारहाण केली व घरातील कपाटाचे काचा फोडुन नुकसान केले तसेच भांडणात फिर्यादीचे आईचे मंगळसुत्र व मोबाईल फोन पडून गहाळ झाला आहे हे निःसंशयपणे शाबीत करणे आवश्यक आहे.

**<u>मुद्दा क्र.१ ते १० करीता</u> :-**

१०. अभियोगपक्षास पुरेशी संधी देवूनही अभियोगपक्ष एकाही साक्षीदाराची साक्ष नोंदवू शकला नाही. प्रकरणातील खबरी संभाजी नामदेव भेगडे यास समन्स तसेच जामीनपात्र वॉरंटची बजावणी होऊन देखील अभियोगपक्ष त्याची साक्ष नोंदवू शकला नाही. प्रकरणातील इतर साक्षीदारांना देखील समन्सची बजावणी होऊन देखील अभियोगपक्ष त्यांची साक्ष नोंदवू शकला नाही. प्रस्तुत प्रकरण हे सन २०१२ पासून पुराव्याकामी नेमण्यात आले होते परंतू अभियोगपक्ष एकाही साक्षीदाराची साक्ष नोंदवू शकला नाही. सबब, प्रकरणाचे जुने स्वरुप पाहता नि. क्र. १ वर आदेश पारित करुन अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

११. प्रकरण हे १६ वर्षे जुने असल्यामुळे अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आल्यामुळे आरोपींविरुध्द कोणताही पुरावा

आरोपींवरील दोषारोप सिध्द करण्यात आला नाही. अभिलेखावर येऊ शकला नाही. त्यामुळे अभियोगपक्षाच्या एकंदरीत कथनाविषयी संशय निर्माण होतो. त्यामुळे वरील विवेचन विचारात घेता अभिलेखावर आरोपींना दोषी ठरवावे इतपत ठोस पुरावा उपलब्ध नसलेने आरोपी क्र. १ ते ९ हे निर्दोष मुक्त होणेस पात्र आहेत. म्हणून मी मुद्दा क्र.१ ते ९ चे उत्तर वरील प्रमाणे देवून मुद्दा क्र.१० करीता खालील आदेश पारीत केला.

## <u>आदेश</u>

१. **आरोपी क्र. १ रामचंद्र खंडु भेगडे, २. प्रविण रामचंद्र भेगडे, ३. प्रशांत रामचंद्र भेगडे, ४. अनुप तानाजी भेगडे, ५. तानाजी मुकूंद भेगडे, ६.विलास सिताराम भेगडे, ७. सौ. उषा विलास भेगडे, ८. सौ. नंदा तानाजी भेगडे, ९. सौ. लक्ष्मी रामचंद्र भेगडे** यांची भारतीय दंड विधान संहिता कलम १४३,१४७,१४८,४५२,३२३,३२४,५०४,५०६,४२७ अन्वये गुन्ह्यातुन फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २४८ (१) नुसार निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपींचा वैयक्तिक जातमुचलका व जामीन कदबा रद्द करणेत येत आहे.

३. आरोपींनी फौजदारी संहिता कलम ४३७ (अ) अन्वये रक्कम रु.२५,०००/- चे वैयक्तीक बंधपत्र द्यावे.

४. सदर न्यायनिर्णय फौजदार प्रक्रिया संहिता कलम ३५३ (१) नुसार खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात येत आहे.

५. खटल्यातील जप्त मुद्देमाल दोन काठया मुल्यहिन असल्यामुळे अपिलीय कालावधी संपलयानंतर नष्ट करण्यात यावी.जप्त मुद्देमाल एक लोखंडी तलवार जिल्हा दंडाधिकारी, पुणे यांच्याकडे विल्हेवाट लावण्याकरीता पाठवण्यात यावी.

VISHNU RAMCHANDRA DOIFODE
Digitally signed by VISHNU RAMCHANDRA DOIFODE
Date: 2026.06.24 16:56:56 +0530

**दि.२४/०६/२०२६.**

**(श्री. व्ही.आर. डोईफोडे)**
**४ थे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**वडगाव मावळ, पुणे.**

**CERTIFICATE**

I affirms that the contents of this P.D.F file Judgment are same word for word as per original order.

Name of Steno : M. B. Ingole (Grade-III)

Court Name : Shri. V.R. Doifode, 4th Jt. C.J.J.D. & J.M.F.C. Vadgaon Maval, Pune.

Date of order :24/06/2026.

Order signed by P.O. on :24/06/2026.

Order uploaded on :24/06/2026.